''कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका

# प्रेस नोट

## नागरिकांना सहकार्याचे आवाहन.

## श्री. रवि पवार मा .उप आयुक्त (कर आकारणी व कर संकलन ) यांचे आवाहन.

पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नातील " मिळकत कर हा सर्वात महत्त्वाचा महसुली स्त्रोत " असून, नागरिकांना वेळेवर व दर्जेदार सेवा देण्यासाठी मिळकतकर विभाग सातत्याने कार्यरत आहे.

सध्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा विशेष कार्यक्रम(SIR) हाती घेण्यात आला आहे. या महत्त्वाच्या राष्ट्रीय कामकाजासाठी मिळकतकर विभागातील जवळपास बहुतांश अधिकारी व कर्मचाऱ्यांची पूर्ण वेळ नियुक्ती करण्यात आलेली आहे. परिणामी, विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या काही सेवांमध्ये तसेच नागरिकांच्या विविध प्रकरणांच्या निपटाऱ्यात विलंब होण्याची शक्यता आहे.

या अनुषंगाने नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल मिळकतकर विभागामार्फत दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. सदर परिस्थिती ही राष्ट्रीय कर्तव्याच्या अनुषंगाने निर्माण झालेली तात्पुरती बाब असून, मतदार याद्या पुनरिक्षण विषयक कामकाज पूर्ण होताच प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात येईल.

उपायुक्त (कर आकारणी आणि संकलन विभाग) श्री. रवि पवार यांनी पुणेकर नागरिकांना आवाहन केले आहे की, या कालावधीत संयम बाळगून महानगरपालिकेस सहकार्य करावे.

13.7.26

(रवि पवार)
उप आयुक्त
कर आकारणी व कर संकलन विभाग
पुणे महानगरपालिका